ठाणे, सोमवार दि. १ जुलै २०२४ | वर्ष : १३, अंक : ६४ , पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख
**राज्य सरकारची द्विवर्षपूर्ती आणि आव्हान**
शिवसेनेतील फुटीला आणि राज्यातील नव्या सरकारला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. दोन वर्षादरम्यान अनेक राजकीय घडामोडी होऊन महाराष्ट्राचे ......पान २ वर

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
# दैनिक महाराष्ट्र सम्राट
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे



मुंबई-नाशिक महामार्गावर खड्डे; मुंबई-नाशिक महामार्गावर खड्डे
...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**
सोने ७१,६०० | चांदी ८७,३९०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आपल्यापेक्षा स्टँडर्ड याचक आहेत ते! निवडणुकीदरम्यान ते आता कंपन्यांना आर्थिक दान मागतात.

# आजपासून तीन नवीन फौजदारी कायदे लागू...

**नवी दिल्ली – ब्रिटिश काळात बनवलेले कायदे बदलण्यासाठी केंद्र सरकारने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये तीन नवीन फौजदारी कायदे आणले होते. हे कायदे आता लागू होणार आहेत. या तिन्ही फौजदारी कायद्यांबाबत यावर्षी फेब्रुवारी महिन्यात राजपत्रात अधिसूचना जारी करण्यात आली होती.**

देशात १ जुलैपासून जुने कायदे रद्द होऊन त्यांची जागा तीन नवे कायदे घेणार आहेत. भारतीय दंड संहिता (१८६०) च्या बदल्यात भारतीय न्यायिक संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता IPC (१८९८) च्या बदल्यात भारतीय नागरीक संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा कायदा (१८७२) च्या बदल्यात भारतीय साक्ष अधिनियम हे कायदे लागू होतील. त्यामुळे कोर्टात सुरू असलेल्या जुन्या खटल्यांचे काय होणार असा प्रश्न विचारला जात आहे.

देशात जरी नवीन कायदे लागू होत असले तरी जुन्या खटल्यांवर मात्र त्याचा काही परिणाम होणार नाही. जुने खटले हे जुन्याच आयपीसी आणि सीआरपीसी कायद्यानुसार सुरू राहतील. मात्र १ जुलैपासून जे काही नवीन गुन्हे वा खटले सुरू होतील त्यांना मात्र नवीन कायदा लागू होणार आहे. (पान २ वर)



## या कायद्यांचे नावे...

1. भारतीय दंड संहिता (१८६०) च्या बदल्यात भारतीय न्यायिक संहिता,
2. फौजदारी प्रक्रिया संहिता IPC (१८९८) च्या बदल्यात भारतीय नागरीक संरक्षण संहिता
3. भारतीय पुरावा कायदा (१८७२) च्या बदल्यात भारतीय साक्ष अधिनियम हे कायदे लागू होतील.

**वकील आणि न्यायाधीशांना आता नवीन आणि जुने अशा दोन्ही कायद्यांचे भान ठेवावे लागणार आहे. जुने गुन्हेगारी खटले जुन्या IPC अंतर्गतच चालू राहतील. तर १ जुलै रोजी आणि त्यानंतर झालेले गुन्हे नवीन कायद्यांतर्गत आहेत. एफआयआरमध्ये कायद्याचे नाव आणि कलम बदलले जातील.**

## इलेक्ट्रॉनिक पुराव्यावर भर

- नव्या कायद्यानुसार पारंपरिक पद्धतीने सुनावणी करण्याऐवजी आता केसेसची संपूर्ण सुनावणी कॅमेऱ्यात रेकॉर्ड होणार आहे. समन्स किंवा अटॅचमेंट ऑर्डर हे ई-मेल किंवा इलेक्ट्रॉनिक मेसेज (Whatsapp किंवा साधे फोन मेसेज) द्वारे दिले जातील. समन्स बजावण्यापासून आणि आरोपी किंवा पक्षकाराच्या घरी वारंवार जाण्यापासून पोलिसांची सुटका होणार आहे.
- पण इलेक्ट्रॉनिक गॅझेटमुळे अनोळखी, अशिक्षित, शेतकरी, ग्रामस्थ किंवा सर्वसामान्यांच्या त्रासात वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जर एखाद्याकडे संसाधने नसतील तर त्याच्याविरुद्ध समन्स कधी जारी केला जाईल किंवा जोडणीचे आदेश येतील हे त्याला कळणार नाही.
- CrPC मध्ये सर्वात मोठा बदल इलेक्ट्रॉनिक पुराव्यांबाबत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे, व्हिडीओ, सोशल मीडियावरील पोस्ट, खाजगी चॅटिंग इत्यादींचा पुरावा म्हणून समावेश केल्यास गुन्हेगारी कायदा मजबूत होईल. पोलिसांव्यतिरिक्त न्यायिक अधिकाऱ्यांनाही यासाठी प्रशिक्षणाची गरज भासणार आहे.

## न्यायालयीन कोठडीची मुदत १४ दिवसांऐवजी ९० दिवसांपर्यंत

जुन्या सीआरपीसीमध्ये न्यायालयीन कोठडीचा कमाल कालावधी १४ दिवसांचा होता. ती संपल्यानंतर गुन्हेगाराला न्यायालयात हजर करणे बंधनकारक असायचं. आता पोलिसांना ९० दिवसांपार्यंत कोणालाही न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा अधिकार मिळणार आहे. वारंवार आरोपींना न्यायालयात हजर करण्याच्या जबाबदारीतून पोलिसांची सुटका होणार आहे.



# आता देशातील जंगल सफारीला लागणार टाळे

- **पावसाळा आणि सुरक्षेच्या कारणास्तव जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सफारी बंद राहणार आहे.**
- **बफर भागात मान्सून सफारी उपलब्ध असेल.**

नागपूर : भारतातील व्याघ्रप्रकल्प, अभयरण्यांमध्ये पर्यटनाची इच्छा असली, तरी पर्यटकांना त्यांच्या इच्छेला आवर घालावा लागणार आहे. कारण, भारतातील सर्व व्याघ्रप्रकल्प आणि अभयारण्याच्या प्रवेशद्वाराला कुलूप लागणार आहे. शाळांना उन्हाळी सुट्या असल्या तरी भारतातील व्याघ्रप्रकल्प, अभयारण्यांना मात्र पावसाळी सुट्या लागतात. येत्या एक जुलैपासून म्हणजेच सोमवारपासून पर्यटनाचे प्रवेशद्वार बंद होणार आहेत. मात्र, या सुट्या व्याघ्रप्रकल्प आणि अभयारण्याच्या कोअर म्हणजेच गाभा क्षेत्राला असून बहुतांश ठिकाणी बफक्षेत्र पर्यटनासाठी खुले ठेवण्यात आले आहे.

पावसाळा आणि सुरक्षेच्या कारणास्तव जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सफारी बंद राहणार आहे. त्यामुळे पर्यटकांना तीन महिने जंगल सफारीचा आनंद घेता येणार नाही. विदर्भातील पेंच व्याघ्र प्रकल्प, उमरेड कऱ्हांडला, बोर व्याघ्र प्रकल्प, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रभावित झालेल्या प्रमुख व्याघ्र प्रकल्पांचा समावेश आहे. जंगल पर्यटनासाठी वापरण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे हा निर्णय वन विभागाकडून दरवर्षी घेण्यात येतो. हे रस्ते कच्चे आणि मातीचे आहेत. पावसाळ्यात खूप चिखल होतो. त्यामुळे जीप व इतर वाहने अडकून पर्यटकांना त्रास व असुरक्षित परिस्थिती निर्माण होते. तसेच पावसाळा हा वन्यजीव, पक्षी, कीटक यांच्या मिलनाचा देखील काळ असतो. अशावेळी वाहनांमुळे जमिनीवरील हे हे छोटे जीव चिरडून जाऊ नयेत, ही कारणे (पान २ वर)

**थोडक्यात घडामोडी**

## दुचाकीवरील सोनसाखळी चोरट्याने सोनसाखळी खेचल्याच्या दोन घटना

ठाणे – ठाण्याच्या कासारवडवली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ओवळा येथे साफसफाईचे काम करणाऱ्या ५५ वर्षीय महिला तक्रारदार यांच्या गळ्यातील ३५ हजाराची सोनसाखळी खेचण्याच्या घटनेनंतर कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३७ वर्षीय महिलेच्या गळ्यातील १ लाख २० हजाराची सोनसाखळी दुचाकीवरील अज्ञात चोरट्याने जबरदस्तीने खेचून पोबारा केला. दोन्ही घटना शनिवारी रात्री घडल्या असून दोन्ही पोलीस ठाण्यात रविवारी(ता-३० जून) रोजी दाखल कार्नाय्त आलेल्या आहेत. तक्रारदार सुरेखा लहू वळवी(५५) रा. वळवीपाडा, खुषी बारख्या पाटीमागे, नागलाबंदर स्वतःचे घर घोडबंदर रोड, ठाणे या ओवळा येथे ब्ल्यू रूफ हॉटेलमध्ये साफसफाईचे काम करतात घटनेच्या दिवशी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास काम संपल्यानंतर रात्री ९ वाजण्याच्या त्तक्रारदार कासारवडवली सिग्नल जवळून जात असताना त्यांच्या जवळ आलेल्या दुचाकीवरील अज्ञात सोनसाखळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून पोबारा केला. तर दुसरी घटना हि कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत लोढा कासा रॉयल सोसायटीच्या मेनगेटजवळ असलेल्या रिक्षा स्टैंडजवळ घडली. (पान २ वर)

# धक्कादायक! पोलीस भरतीचं स्वप्न अधुरे

## चाचणीदरम्यान २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू तर एकाची प्रकृती चिंताजनक

मुंबई : पोलिसांची वर्दी घालून देशसेवा करण्याचं आभाळभर स्वप्नं पाहिलं होतं. आपल्या स्वप्नाला गवसणी घालण्यासाठी ठाणे गाठले. मात्र पोलीस बनायचं स्वप्नं पाहिलं होतं, मात्र त्याच सप्नानं शेवटचा श्वास घेतला. ठाण्यात पोलीस भरतीसाठी धावताना अमळनेरच्या एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. तर पोलीस भरती मैदानी चाचणीदरम्यान सहा जणांची प्रकृती खालावली आहे. अत्यवस्थ उमेदवारांवर कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अक्षय बिहाडे या २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झालाय. (पान २ वर)

### कुटुंबाला मोठा धक्का

इतरा अत्यावस्थ तरुणांवर छत्रपती शिवाजी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. दरम्यान, अक्षयला हृदयविकाराचा झटका आला की त्याने काही सेवेन केले होते, याची तपासणी रुग्णालयाकडून करण्यात येत आहे. शवविच्छेदनानंतरच त्याच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होणार असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. अक्षयच्या मृत्यूमुळे मैदानावर धावाधाव करणाऱ्या अनेकांना धक्का बसला आहे. पोलीस होऊन कुटुंबाला हातभार लावेल, असं त्याचे स्वप्न होतं. मात्र अक्षयच्या अचानक जाण्यामुळे संपूर्ण कुटुंबाला मोठा धक्का बसला आहे. तरीही त्याच्या मृत्युचं नेमकं कारण अद्याप कळू शकलेलं नाही. नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, रोशनीला कुठल्याही प्रकारचा आजार नव्हता.



### सात उमेदवारांना भोवळ

पोलिस भरतीदरम्यान मृत झालेल्या तरुणाचे नाव अक्षय मिलींद बिहाडे (२५) असे असून तो जळगाव येथील अंमळनेर येथे राहत होता. अक्षयने राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११, नवी मुंबई कॅम्पच्या सशस्र पोलिस शिपाई भरतीसाठी अर्ज केला होता. शनिवारी बाळेगाव, वाकळण येथील एसआरपीएफच्या कॅम्पमध्ये मैदानी चाचणी सुरू होती. पुरुष उमेदवारांमध्ये ५ किमी धावण्याची चाचणी सुरू असताना सात उमेदवारांना चक्कर येऊन ते खाली पडले.लगेच त्यांना जवळील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. मात्र या ठिकाणी पोहोचण्यापूर्वीच अक्षयचा मृत्यू झाला.

# राज्याच्या मुख्य सचिवपदी सुजाता सौनिक यांची नियुक्ती

**मुंबई : राज्याच्या मुख्य सचिवपदी सुजाता सौनिक यांची नियुक्ती झाली असून ते या पदावर विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला अधिकारी असतील. सुजाता सौनिक या १९८७ बॅचच्या आयएएस अधिकारी आहेत. सुजाता सौनिक याचे पती मनोज सौनिक यांनीदेखील राज्याचे मुख्य सचिव म्हणून काम पाहिले आहे. सुजाता सौनिक यांनी या आधी राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदाचा कार्यभार सांभाळला आहे. त्यानंतर आता त्यांना मुख्य सचिवपदाची संधी मिळाली आहे. सुजाता सौनिक यांना मुख्य सचिवपदाचा एक वर्षांचा कार्यकाळ लाभणार असून जून २०२५ मध्ये त्या निवृत्त होणार आहेत. रविवारी संध्याकाळी ५ वाजता मावळते मुख्य सचिव नितीन करीर यांच्याकडून त्या सूत्रे हाती घेणार आहेत.**



### कोण आहेत सुजाता सौनिक?

सुजाता सौनिक यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण चंदीगड मध्ये झाले आहे. पंजाब विद्यापीठामधून इतिहास विषयात पदव्युत्तर पदवी त्यांनी घेतलीय. त्यानंतर त्यांनी कौशल्य विकास विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव गृहमंत्रालय, सरकारच्या सल्लागार सहसचिव अशा महत्त्वाच्या पदावर देखील कारभार सांभाळला आहे. त्या गेल्या तीन दशकांपासून प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत.

### पती आणि पत्नी मुख्य सचिव

- सुजाता सौनिक या राज्याच्या वरिष्ठ अधिकारी असून त्या निवृत्त आयएएस अधिकारी मनोज सौनिक यांच्या पत्नी आहेत. या आधी मनोज सौनिक यांनीही राज्याचे मुख्य सचिव म्हणून काम केलंय. सुजाता सौनिक यांच्या नियुक्तीमुळे आता पती आणि पत्नी मुख्य सचिव होण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे.
- नितीन करीर यांना तीन महिन्यांचा अतिरिक्त कार्यकाळ देण्यात आला होता. तो कालावधी संपल्यानंतर आता या पदावर सुजाता सौनिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नितीन करीर यांचा कालावधी पुन्हा एकदा वाढवून देण्यात येणार असल्याची चर्चा होती. पण राज्य सरकारकडून तसे न करता सुजाता सौनिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- सेवाज्येष्ठतेनुसार, १९८७ च्या तुकडीतील गृहविभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार (१९८८) आणि मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंह चहल (१९८९) हे मुख्य सचिवपदाचे दावेदार मानले जात आहेत. त्यामध्ये सुजाता सौनिक यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे.

# एस.बी. आय म्युचुवल फंडाची पॉलिसी अज्ञाताने परस्पर काढून ५.४१ लाखांचा गंडा

ठाणे – ठाण्याच्या बँकेच्या खोपट परिसरातील तक्रारदार सरीता राकेश तिवारी(३९) यांच्या बहिणीच्या खात्यावर असलेली एस.बी. आय म्युचुवल फंडाची पॉलिसीचे ४ लाख ९१ हजाराची रक्कम अज्ञाताने तक्रारदार किंवा खातेदाराला माहिती न पडू देता लांबविल्याची तक्रार ठाणे सायबर खात्याच्या पोर्टलवर आणि शुक्रवारी (ता-२८ जून) रोजी नौपाडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेली आहे. तक्रारदार सरीता राकेश तिवारी(३९) रा. रुम नंबर २०१ प्रभावती टॉवर, शिवसेना शाखेच्या पाठीमागे, खोपट, यांच्या बहीण प्रिती रामप्रसाद तिवारी अविवाहित असून तिचे ठाणे जनता सहकारी बैंक, (पान २ वर)

# टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या टीम इंडियात शिक्षकापासून कर्णधारपर्यंत होणार मोठे उलटफेर...!

**नवी दिल्ली – रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२४ मधील आयसीसी टी-२० विश्वचषक जिंकला. या विजयानंतर भारतीय क्रिकेट चाहत्यांना आनंद झाला आहे. मात्र, या सगळ्या आनंदादरम्यान चाहत्यांसाठी एक वाईट बातमीही आहे. या विश्वचषकानंतर भारताच्या टी-२० संघात अनेक मोठे बदल पाहायला मिळतील. टी-२० संघात कर्णधारापासून मुख्य प्रशिक्षकांपर्यंत अनेक बदल होणार आहेत.**



### टी-२० संघाला मिळणार नवीन कर्णधार–

टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्यासोबत माजी कर्णधार विराट कोहलीने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. या दोन्ही खेळाडूंनी भारतासाठी शेवटचा टी-२० सामना विश्वचषकातील दक्षिण अफ्रिकेविरुद्ध अंतिम सामना खेळला. आता रोहित शर्मा आणि विराट कोहली भारताच्या टी-२० संघात दिसणार नाहीत. रोहित शर्माने रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर टी-२० संघाला नवा कर्णधार मिळणार आहे. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत हार्दिक पांड्या अनेकदा भारतीय टी-२० संघाची धुरा सांभाळताना दिसला. रोहित शर्माच्या काळापर्यंत कोणत्याही टी-२० संघाचा कायमस्वरूपी कर्णधार नव्हता, मात्र आता रोहितनंतर संघाला कायमस्वरूपी कर्णधार मिळणार आहे. आता भारताच्या टी-२० संघाचा कायमस्वरूपी कर्णधार कोणाला केले जाते हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### विराट कोहलीची जबाबदारी कोण घेणार?

विराट कोहलीची जागा कोणताही खेळाडू घेऊ शकत नाही. यंदाचा विश्वचषक वगळता विराट कोहली टी-२० फॉरमॅटमध्ये भारताकडून तिसऱ्या क्रमांकावर खेळायचा. अशा स्थितीत कोहलीनंतर तिसऱ्या क्रमांकावर खेळणाऱ्या खेळाडूची जबाबदारी मोठी असेल. आता तिसऱ्या क्रमांकावर कोणत्या खेळाडूला संधी दिली जाते हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### मुख्य प्रशिक्षकही बदलणार

टी-२० विश्वचषक संपल्यानंतर टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा कार्यकाळही संपला. राहुल द्रविड हे तिन्ही फॉरमॅटमध्ये भारताचे प्रशिक्षक होते. आता टीम इंडियाला तिन्ही फॉरमॅटमध्ये नवा प्रशिक्षक मिळणार आहे. मुख्य प्रशिक्षकपदासाठी गौतम गंभीरच्या नावाची जोरदार चर्चा आहे. मात्र, या पदाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

### राहुल द्रविड यांच्या प्रयत्नांना यश

भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्यासाठी निरोपाची ही अप्रतिम भेट ठरली. नोव्हेंबर २०२१ रोजी मुख्य प्रशिक्षकपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर भारतीय संघात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. अनुभवी खेळाडू आणि युवा खेळाडूंमध्ये ताळमेळ बसवून ड्रेसिंग रुममधील वातावरण हसता ठेवण्याचा राहुल द्रविड यांनी प्रयत्न केला. याच प्रयत्नांना आज यश मिळाले.



## विराट, रोहितनंतर आता 'रवींद्र जडेजाने केली निवृत्तीची घोषणा



हा खेळाडू दुसरा तिसरा कोणी नसून मैदानात वाघासारखा वावरणारा रवींद्र जडेजा आहे. त्याने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. इन्स्टाग्राम खात्यावर एक पोस्ट लिहून त्याने आपला हा निर्णय सार्वजनिक केला आहे. रवींद्र जडेजा असा काही निर्णय घेईल, याची कल्पना कोणालाही नव्हती. पण विश्वचषक हाती आल्यानंतर त्याने निवृत्तीची घोषणा केली आहे.

**रविंद्र जडेजाने नेमकी काय घोषणा केली? काय म्हणाला?**

विराट कोहली, रोहित शर्मानंतर रवींद्र जडेजानं देखील टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. सुसाट वेगानं अभिमानानं धावणाऱ्या अश्वाप्रमाणं माझ्या देशासाठी मी माझं सर्वोत्तम देण्याचा नेहमी प्रयत्न केला. इतर फॉरमॅटमध्ये मी माझं सर्वोत्तम योगदान देण्याचा प्रयत्न करणार आहे. टी २० वर्ल्डकप जिंकण हे स्वप्न सत्यात उतरलं आहे. माझ्या टी २० कारकिर्दीचं सर्वोच्च शिखर आहे. अनेक आठवणी, प्रोत्साहन अन् पाठिंब्यासाठी सर्वांना धन्यवाद, असं रवींद्र जडेजा म्हणाला.

महाराष्ट्र सम्राट



# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## राज्य सरकारची द्विवर्षपूर्ती आणि आव्हान

शिवसेनेतील फुटीला आणि राज्यातील नव्या सरकारला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. दोन वर्षादरम्यान अनेक राजकीय घडामोडी होऊन महाराष्ट्राचे सर्व रुपडे पालटले आहे. राज्य सरकारला दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्स मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर या सर्व घडामोडींवर एक पोस्ट लिहिली आहे. दोन वर्षांपूर्वी जून २०२२ मध्ये विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीची मतमोजणी सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील १६ आमदारांसह गुजरातच्या सुरत शहरात कसे गेले आणि शिवसेना विधिमंडळ पक्षात उभी फूट पडली हे लिहिले आहे. त्यानंतर पक्षातील आणखी २४ आमदार त्यांना जाऊन मिळाले. पाठोपाठ शिंदे गुवाहाटी (आसाम) शहरात गेले. गुवाहाटीत काही वाटाघाटी केल्यानंतर ते मुंबईत परतले आणि त्यांनी मूळ शिवसेना पक्षावर दावा केला. तसेच भाजपाबरोबर हातमिळवणी करून राज्यात सत्तास्थापनही केली. या घटनेला आता दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. गत दोन वर्षांत शिवसेनेच्या दोन गटांमध्ये परस्परांवर कुरघोडीचे अनेक प्रयत्न झाले. निवडणूक आयोगाने मूळ शिवसेना पक्ष आणि पक्षाचे धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिले. तसेच यानंतर विधानसभेच्या अध्यक्षांनीही निवडणूक आयोगाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. परिणामी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे नाव बदलून उद्धव बाळासाहेब ठाकरे गट शिवसेना असे नाव निवडणूक आयोगाने दिले. तसेच त्यांना मशाल या चिन्हावर निवडणूक लढवावी लागली. तसेच या दोन वर्षादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये भाजपाने फूट पाडून दोन गट निर्माण केले. यात अजित पवारांनी राजकीय हालचाली करत बंडखोरी केली. शरद पवार स्थापित राष्ट्रवादी पक्षातील बहुतांश आमदार अजित पवारांना मिळाल्यानंतर झालेल्या वादात निवडणूक आयोगाने अजित पवार गटाला राष्ट्रवादी पक्षाचे नाव व चिन्ह घड्याळ दिले. अजित पवारांनी भाजपाशी हातमिळवणी केली. राज्यात अशाप्रकारे दोन प्रादेशिक पक्ष फुटून बंडखोर गट राज्याच्या सरकारमध्ये सामील झाले. एकनाथ शिंदे यांनी राज्य सरकारच्या द्विवर्षपूर्तीबद्दल म्हटले आहे की, आम्ही बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे विचार घेऊन पुढे जात आहोत. दोन वर्षांपूर्वी जून २०२२ मध्ये विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीची मतमोजणी सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील ४० आमदारांसह बंडखोरी करत आपला वेगळा गट निर्माण केला. शिवसेना विधिमंडळ पक्षात उभी फूट पडली. तत्कालीन उद्धव ठाकरे सरकार कोसळले. राज्यात नवीन राजकीय समीकरणे निर्माण होत भाजपाच्या पाठींब्याने एकनाथ शिंदे यांनी सत्तास्थापन केली. या घटनेला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये आपले विचार व्यक्त करताना म्हटले आहे, विचार, विकास आणि विश्वास ही त्रिसूत्री राबवत राज्यात सत्तेवर आलेल्या सामान्यांच्या सरकारला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा विचार, राज्याच्या विकासाचा ध्यास आणि सामान्यांचा विश्वास यांच्या बळावर महायुती सरकारने दोन वर्षांची यशस्वी वाटचाल केली आहे. शिंदे यांनी पुढे म्हटले आहे की, या दोन वर्षांच्या काळात देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं भक्कम पाठबळ लाभले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि सर्व सहकाऱ्यांची समर्थ साथ लाभली. राज्यातील जनतेने दिलेले प्रेम, शिवसैनिकांची साथ आणि महायुतीमधील पक्षांचा उत्तम समन्वय यामुळे लोकहिताची शेकडो कामे मार्गी लागली. राज्यातील शेतकरी, कष्टकरी, महिला, ज्येष्ठ आणि युवकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू उमटवता आले. आम्ही घेतलेल्या निर्णयावर राज्यातील जनतेनेही विश्वासाची मोहर उमटवत साथ दिली, याचा अभिमान आहे आणि त्यातून निर्माण झालेल्या जबाबदारीचे भानही आहे. मुख्यमंत्र्यानी राज्य सरकारच्या द्विवर्षपूर्तीबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया दिली असली तरी राज्य सरकार व विरोधकांचा बराचसा वेळ स्वतःच्या पक्षांचे अस्तित्व निर्माण करण्यात आणि न्यायालयीन लढाई लढण्यात गेला, हे मान्य करावे लागेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जरी म्हटले की, आम्हाला विकास साधायचा आहे आणि विश्वास वृद्धिंगत करायचा आहे, तरी त्याला बराच अवधी लागेल असे वाटते. कारण शिंदे गट शिवसेनेला आपल्याच पूर्वीच्या मूळ पक्षाशी संघर्ष करण्यात दीड वर्ष लागली. तोवर लोकसभेची निवडणूक आली. त्यांच्या व ठाकरे गट शिवसेनेला सदर निवडणुकीची योग्य तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. अजित पवार गट राष्ट्रवादीची तर लोकसभा निवडणुकीत पिछेहाट झाली. म्हणावे असे यश मिळाले नाही. आता राज्य सरकारच्या कामाला सूर लागेल अशी चिन्हे आहेत. येत्या काही महिन्यांत आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीत पक्षनेतृत्वाला लक्ष घालावे लागेल. एकनाथ शिंदे यांच्यासमोर पक्ष एकजुटीने ठेवण्याचे व आगामी निवडणुकीत यश मिळवण्याचे आव्हान आहे.

# आमली पदार्थ विक्रेत्यांचे लक्ष्य शाळकरी मुले!

**मुंबई – पुण्यातील घटनेनंतर राज्यभरातील आणि त्यातही मुंबई महानगर प्रदेशातील बेकायदा पब, हॉटेल, हुक्का पार्लरवर कारवाईचा धडाका सुरू झाला. सध्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईदर, कल्याण-डोंबिवलीत एकामागोमाग एक बेकायदा हॉटेल, बार पाडले जात आहेत. गेल्या गेल्या चार-पाच वर्षांपासून ठाणे आणि परिसरातील तरुणाईला अमली पदार्थांचा कसा विळखा बसला आणि तो सोडविण्यात स्थानिक यंत्रणा कशा कुचकामी ठरल्या याच्या कहाण्या आता पुढे येत आहेत.**

### संरक्षण देणारी साखळी

ठाण्यापासून भिवंडी, अंबरनाथ, बदलापूरपर्यंत विस्तारलेल्या ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात पोलिसांनी गेल्या दीड वर्षात ६० कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. यामध्ये गांजा, चरस आणि एमडी या अमली पदार्थांचा सर्वाधिक समावेश आहे. पण गेल्या पाच ते सात वर्षांत हे प्रमाण उघडकीस आले त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असल्याचे माहीतगारांचे म्हणणे आहे. गेल्या काही वर्षांत ठाण्यात रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या पब, लेडीज बार, हुक्का पार्लर यांना अक्षरश: ऊत आला आहे. परमबीर सिंह यांच्याकडे ठाण्याचे पोलीस आयुक्तपद असताना हे प्रकार वाढीस लागले. आता तर कोठारी कंपाऊंडसारख्या परिसरात या धंद्यांची लांबलचक साखळीच उभी राहिली आहे. ठाणे महापालिकेत तर रात्रभर चालणाऱ्या पब, हॉटेलांना संरक्षण देणारी एक मोठी यंत्रणाच कार्यरत आहे. ठाणे शहरातील भाजप आमदार संजय केळकर गेली अनेक वर्षे शहरातील वाढत्या अमली पदार्थांच्या वापराविषयी कंठशोष करत आहेत. पण तरीही हे धंदे का थांबले नाहीत हा प्रश्न सुजाण ठाणेकरांना सतावतो आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयात मोक्याच्या जागा मिळाव्यात यासाठी ठरावीक पोलीस अधिकाऱ्यांकडून केली जाणारी मोर्चेबांधणी आणि याच यंत्रणेचा या धंद्यांना असलेला



आशीर्वाद आतापर्यंत सरकारी यंत्रणेला ठाऊक नव्हता का, हा खरा प्रश्न आहे.

### परवलीचे शब्द कसे?

समाजमाध्यमांवरून अमली पदार्थ मागविण्यासाठी परवलीचे शब्द वापरले जातात. तसेच रेव्ह पार्ट्यांच्या निमंत्रणासाठीदेखील वेगवेगळ्या आकृती, चित्रांचा वापर होत असतो. रेव्ह पार्टीच्या आयोजनाची माहिती विशिष्ट संदेश पाठवून दिली जाते. समजा, संदेशामध्ये वाघ, साप, जंगलाचे छायाचित्र असेल, तर ती पार्टी जंगलात आयोजित असेल. तसेच रशियन भाषेचादेखील मोठ्या प्रमाणात वापर होतो. उत्तर प्रदेश येथे एमडीची निर्मिती केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाणे पोलिसांच्या पथकाने तेथे जाऊन ही प्रयोगशाळा उद्ध्वस्त केली होती. आरोपींमध्ये विज्ञान शाखेतील तरुणाचा सामावेश होता. एमडी पावडर तयार करण्यासाठी कोणत्या रसायनांचा वापर केला जातो याची माहिती त्याला होती. इतर काही राज्यांमध्येही अशा टोळ्या सक्रिय आहेत. त्या निर्जनस्थानी बंद कारखान्यांत, गोदामांमध्ये या प्रयोगशाळा सुरू करतात. जिथे पोहोचणे पोलिसांना कठीण असते. ३१ डिसेंबरच्या रात्री घोडबंदर भागात आयोजित एका रेव्ह पार्टीमध्ये पोलिसांनी १०० तरुणांना ताब्यात घेतले. ही मुले कॉलसेंटर, आयटी क्षेत्र किंवा विद्यार्थीदशेतील होती.

### ठाण्यात अमली पदार्थ येतात कसे?

ठाणे शहरात मुंबई नाशिक महामार्ग, घोडबंदर, मुंब्रा बाह्यवळण, शिळफाटा अशा महत्त्वाच्या मार्गांचे जाळे आहे. ठाणे शहराला मिरा भाईंदर, नवी मुंबई, मुंबई ही शहरे जोडली जातात. त्यामुळे तस्करांना मुख्य मार्ग आणि महामार्गांवरून सहज वाहनाने शहरात दाखल होता येते.

जिल्ह्यात अमली पदार्थ पोहोचविण्यासाठी पान टपऱ्या आणि महामार्गालगतच्या ढाब्यांचा वापर अधिक होत होता. या घटकांवर पोलीस, महापालिका कारवाई करतात. त्यापासून सुटका करून घेण्यासाठी अमली पदार्थांचा व्यापक करणारे म्होरके समाजमाध्यमांवर संदेश पाठवून कुरिअरच्या माध्यमातून अमली पदार्थांची वाहतूक करू लागले आहेत. ठाण्यातील सुशिक्षित तरुणांना कुरिअरद्वारे अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी अटक झाली आहे.

## आजपासून तीन नवीन फौजदारी कायदे लागू...

**(पान १ वरून) वकील आणि न्यायाधीशांच्या डोक्याला ताप–** वकील आणि न्यायाधीशांना आता नवीन आणि जुने अशा दोन्ही कायद्यांचे भान ठेवावे लागणार आहे. जुने गुन्हेगारी खटले जुन्या खझउ अंतर्गतच चालू राहतील. तर १ जुलै रोजी आणि त्यानंतर झालेले गुन्हे नवीन कायद्यांतर्गत आहेत. एफआयआरमध्ये कायद्याचे नाव आणि कलम बदलले जातील. नव्या कायद्यात कलमे बदलायला नको होती असे काही कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे. कारण लोकांना त्याची सवय झाली आहे. याआधी कायद्यात काही बदल करायचे असल्यास कलमातच नवीन कलमे अ, ब, क जोडण्यात आली होती. गुन्ह्यांची कलमे बदलल्याने वकील आणि न्यायाधीशांसह पोलिसांच्या अडचणी निर्माण होणार आहेत.

**शिक्षेचे प्रमाण वाढण्याची शक्यता–** सध्याच्या न्यायव्यवस्थेत गुन्हेगारी प्रकरणांमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. पुराव्याअभावी मोठ्या प्रमाणात गुन्हेगार मोकाट सुटतात. इलेक्ट्रॉनिक पुराव्यावर भर दिल्यास पूर्वीपेक्षा अधिक गुन्हेगारांना शिक्षा होईल असे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

## आजपासून देशातील जंगल सफारीला टाळे

**(पान १ वरून)** लक्षात घेऊन दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात जंगल बंद करण्यात आली आहे. मात्र, कमी दर आणि कमी गर्दी यामुळे पावसाळ्यातील वन्यजीव सफारीला जाणे खरोखर मोहक आहे. या जंगलातील दाट पर्णसंभार डोळ्यांना अत्यंत शांत करणारा हिरवागार प्रभाव प्रदान करतात. तुम्ही पावसाच्या थेंबात भिजत असताना वाघांसह वन्यजीव पाहणे हे आनंददायी असते. हिरव्यागार जंगलात जिव्हाळ्याचा निसर्ग आणि वाघ पाहण्याचा तुमचा हेतू असेल, तर पावसाळ्यातील जंगल सफारी उत्तम आहे. या सफारीचा आणखी एक फायदा म्हणजे जंगलातील धबधबे. पावसाळ्यात राष्ट्रीय उद्यानातील बहुतेक बफर झोन सफारींसाठी खुले असतात. तर दक्षिण भारतातील काही राष्ट्रीय उद्याने वर्षभर पूर्णपणे खुली असतात. ताडोबा, पेंच, कान्हा, रणथंबोर, नागरहोल या उद्यानांचे बफर झोन वाघांच्या दर्शनासाठी खूप चांगले आहेत.

पावसाळ्यात सफारी आता तुलनेने सहज उपलब्ध होतात. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पात हिरव्यागार जमिनीवर फिरत असताना आजूबाजूला विविध पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येतो. क्रेस्टेड सर्प गरुडांची हाक ऐका किंवा झाडांवर उडणारे रंगीबेरंगी फ्लायकॅचर पहा. वाघ दिसणे सामान्य असले तरी, पाऊस गौर आणि ठिपकेदार हरीण यांसारख्या तृणभक्षी प्राण्यांना ताजे हिरवे कप्पे शोधत बाहेर आणतात, ज्यामुळे त्यांचे निरीक्षण करणे सोपे होते. तर, मध्यप्रदेशातील पेंच पावसात जंगलाचा शांत अनुभव देते. पावसाळ्यात गाभा क्षेत्र बंद असले तरी, खवासा, रुखड आणि तेलियासारखे पेंचचे बफर हे पावसाळ्यात सफारी करण्यासाठी काही प्रमुख सफारी प्रवेशद्वार आहेत. महाराष्ट्रातील पेंच व्याघ्र प्रकल्प, बोर व्याघ्र प्रकल्प आणि उमरेड-कऱ्हाडला अभयारण्य च्या गाभा भागातील सफारी बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे सिल्लारी, खुर्सापार, कऱ्हांडला , गोठणगाव आणि इतर सर्वाधिक मागणी असलेले सफारी गेट बंद राहतील. त्याचबरोबर बफर भागात मान्सून सफारी उपलब्ध असेल.

## धक्कादायक! पोलीस भरतीचं स्वप्न अधुरे

**(पान १ वरून)** सध्या अनेक तरुण-तरुणी प्रचंड जोमानं पोलीस भरतीच्या तयारीला लागले आहेत. अनेक जिल्ह्यात पोलीस भरती सुरू आहे. नवी मुंबई कॅम्पसाठी सुरू असलेल्या पोलिस भरतीदरम्यान शनिवारी झालेल्या मैदानी चाचणीत अत्यवस्थ झालेल्या सात उमेदवारांपैकी एका तरुणाचा रुग्णालयात मृत्यू झाला आहे. तर आणखी एका तरुणाची प्रकृती चिंताजनक आहे.

## एस.बी. आय म्युचुवल फंडाची पॉलिसी अज्ञाताने परस्पर काढून ५.४१ लाखाचा गंडा

**(पान १ वरून)** खोपट शाखा, ठाणे येथे बचत खाते होते. त्याच खात्याला संलग्न तक्रारदार सरीता आहेत. प्रीती हिच्या एस.बी. आय म्यॅच्युअल फंडाची पॉलिसीपॉलिसी होती. त्याला नॉमिनी तक्रारदार होत्या. सादर पॉलिसी एजंट रितेश पवार यांच्याकडून काढण्यात आलेली होती. एजंट पवार याने तक्रारदार याना फोन करून कळविले तुमची एस.बी. आय म्युचुवल फंडाची पॉलिसी विड्रॉ करण्यात आलेली आहे. बँकेत चौकशी केल्यानंतर बँकेत ५ लाख ४१ हजार ९१८ रुपये जमा होते. मात्र खात्यातून २६ मे रोजी ५ हजार आणि २९ मे रोजी ९९ हजार आणि ८०० रुपयांची रक्कम अज्ञाताने लांबवली. याबाबत खातेदाराला कुठलाही ओटीपी किंवा मेसेज आला नाही. म्हणून पैसे कोपात परिसरातील एक्सीस बँकेत जमा केले. दरम्यान एक्सीस बँकेतून १४ जून, २०२४ रोजी अज्ञाताने ४ लाख ९१ हजार १६४ रुपयांचा गंडा घालण्यात आला. अज्ञाताने तक्रारदाराच्या परस्पर अमेझोन पे च्या खात्यावर ट्रान्सफर करून घेवुन आमची फसवणुक केली असल्याची तक्रार नौपाडा पोलीस थानायत दाखल करण्यात आलेली आहे.

## दुचाकीवरील सोनसाखळी चोरट्याने सोनसाखळी खेचल्याच्या दोन घटना

**(पान १ वरून)** तक्रारदार अनिता दिलीप सावंत(५४) रा. आत्माराम निवास को.औ. सोसा., घर क्र-६०४, ६ वा मजला, राज ज्वेलर्स समोर, बाळकुम पाडा नं.२, ठाणे यांची मुलगी कविता निलेश गायकवाड(३७) ही ठाण्याकडे जाण्यासाठी निघालेल्या असता मागून आलेल्या दुचाकीवरील चोरटयांनी त्यांच्या गळ्यातील १ लाख २० हजाराची सोनसाखलाई जबरदस्तीने खेचून पोबारा केला. दोन्ही घटनांची नोंद कासारवडवली आणि कापूरबावडी पोलीस ठाण्यात करण्यात आलेली आहे.

## भुशी डॅममागच्या डोंगरातील धबधब्यात ५ जण वाहून गेले

### लहान मुलं-महिलांचा समावेश, शोधकार्य सुरु

पुणे : वर्षाविहारासाठी लोणावळ्यातील भुशी डॅम परिसरात पर्यटनासाठी आलेले एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले आहेत.भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या डोंगरातील वॉटर फॉल येथून हे अन्सारी कुटुंब वाहून गेले आहेत. ग्रामस्थ, वन्यजीव रक्षक, पोलीस यांच्या मदतीने शोधमोहीम सुरू आहे मात्र, त्याचा शोध लागला नाही.

भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या डोंगरातील धबधब्याला रेल्वेचा वॉटर फॉल म्हणून ओळखलं जातं.अन्सारी कुटुंब रविवारी परिवारासोबत वर्षाविहारासाठी या परिसरात आले होता. पाण्याच्या प्रवाहात भिजण्याचा आनंद घेण्यासाठी कुटुंब . मात्र, पाण्याला वेग असल्याने वाहून गेले. ऐकमेकांना वाचवण्यासाठी प्रयत्नात वाहून गेल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. धबधब्यातील पाण्याचा प्रवाह भुशी धरणात येते, तिथं शोधकार्य सुरू आहे. आतापर्यंत दोन जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहे. वाहून गेलेल्यांपैकी लहान मुलांचा आणि महिलांचा समावेश आहे.

### लोणावळ्याचं भुशी धरण ओव्हरफ्लो

पर्यटकांची पंढरी समजल्या जाणाऱ्या लोणावळ्यातील भुशी धरण ओव्हरफ्लो झाले आहे. लोणावळा परिसरात शुक्रवार, शनिवारी झालेल्या जोरदार पावसाच्या सरी आणि आज रविवारी सकाळपासून झालेला पाऊस यामुळे भुशी धरणाच्या सांडव्यावरून पाणी वाहू लागले आहे.

### हुल्लडबाजी जीवावर

पावसाळा आला की पुणेकरांचे सहलीचे प्लॅन असतात त्यात लोणावळ्याच्या भुशी डॅमवर पर्यटक गर्दी करतात. पावसाळ्यात लोणावळ्याचं वातावरण आल्हाददायक असतं. त्यामुळे हजारो पर्यटक या ठिकाणी पर्यटनासाठी येत असतात. मात्र काही पर्यटक जीवावर बेतणारे खेळ करतात. त्यामुळे दुर्घटना होते आणि परिणामी जीव जातो. त्यामुळे पर्यटकांनी अतातायीपणा करु नये, असं आवाहन पोलिसांकडून करण्यात येतं. मात्र पोलिसांकडे दुर्लक्ष करुन अनेक तरुण हुल्लडबाजी करताना दिसतात. लोणावळ्यात दरवर्षी अशी प्ररिस्थिती बघायला मिळते. त्यामुळे लोणावळ्यातील प्रत्येक पर्यटनाच्या ठिकाणी स्पीकरवरुन खबरदारीच्या सूचना दिल्या जातात. शिवाय काही ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त देखील असतो. वारंवार पोलिसांकडून आवाहन केलं जातं. सूचना दिल्या जातात. मात्र पर्यटक याकडे दुर्लक्ष करताना दिसतात.

### दुर्घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ

मावळ तालुक्यात भुशी धरण, लोणावळ्यातील विविध पॉईंट्स, गड-किल्ले, लेण्याद्री., आंबेगाव तालुक्यातील भिमाशंकर, जुन्नर तालुक्यातील माळशेज घाट, भोर तालुक्यातील भाटघर धरण आणि गड-किल्ले परिसर. तर वेल्हा तालुक्यातील पानशेत धरण आणि परिसरात वर्षापर्यटनासाठी मोठी गर्दी होते. मुंबई, पुण्यासह बहुतांश जिल्ह्यातील पर्यटकांची पर्यटनासाठी या धरणांना पसंती असते. प्रत्येक विकएण्ड आणि सुट्टीच्या दिवशी मुंबई-पुण्यासह बहुतांश जिल्ह्यातील पर्यटकांची या ठिकाणी मोठी गर्दी उसळते. या धरण आणि इतर भागात नागरिकांच्या होणाऱ्या गर्दीमुळे पाण्यात बुडून तसेच पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मयत होणाऱ्या व्यक्तींच्या संख्येत दरवर्षी वाढ होत आहे.

## दुचाकीवरील सोनसाखळी चोरट्याने सोनसाखळी खेचून केला पोबारा

ठाणे – ठाण्याच्या कासारवडवली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ओवळा येथे साफसफाईचे काम करणाऱ्या ५५ वर्षीय तक्रारदार सुरेखा लहू वळवी यांच्या गळ्यातील ३५ हजाराची सोनसाखळी दुचाकीवरून आलेल्या दुकलीने सोनसाखळी खेचून पोबारा केल्याची त्तक्रार रविवारी (ता-३० जून) रोजी कासारवडवली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली.

तक्रारदार सुरेखा लहू वळवी(५५) रा. वळवीपाडा, खुषी बारख्या पाटीमागे, नागलाबंदर स्वतःचे घर घोडबंदर रोड, ठाणे या ओवळा येथे ब्ल्यू रूफ हॉटेलमध्ये साफसफाईचे काम करतात घटनेच्या दिवशी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास काम संपल्यानंतर रात्री ९ वाजण्याच्या त्तक्रारदार कासारवडवली सिग्नल जवळून जात असताना त्यांच्या जवळ आलेल्या दुचाकीवरील अज्ञात सोनसाखळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून पोबारा केला. या पराकारणी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. पोलीस अधिक तपास करीत आहेत.



## ठाण्यात दुचाकी वाहनाला आग –वाहन जळून खाक



ठाणे – ठाण्याच्या सेंट्रल मैदान, कोर्टनाका परिसरात भर रस्त्यावर दुचाकीला आग लागण्याची घटना घडली. आग लागताच दुचाकी चालक शाहिद हुसेन याने गाडी बाजूला केल्याने दुचाकीवरील चालकासह तीनजण सुखरूप बचावले. घटना रविवारी ३-३० वजण्याच्या सुमारास घडली. ठाण्याच्या राबोडी येथून जांभळी नाका येथे निघालेल्या दुचाकीस्वार शाहिद हुसेन हा सुझुकी एसेंस ही दुचाकीवर पत्नी आणि मुलाला घेऊन निघाला असता कोर्टनक सेंट्रल मैदानाजवळ दुचाकी रस्त्यावर धावत असतानाच अचानक दुचाकीला आग लागली. आग लागल्याची चौल लागताच शाहिद याने दुचाकी रस्त्याच्या बाजूला पार्क करून बाजूला झाले. तर आग वाढली आणि दुचाकी जाळून खाक झाली. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ३-४० वाजण्याच्या सुमारास अग्निशमन दलाने आग विझवली.

## शिंदे-फडणवीस सरकारची दोन वर्षे, मुख्यमंत्र्यांची खास पोस्ट; म्हणाले, महायुतीमधील पक्षांचा...

ठाणे – दोन वर्षांपूर्वी जून २०२२ मध्ये विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीची मतमोजणी सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील १६ आमदारांसह गुजरातचं सुरत शहर गाठलं आणि शिवसेना विधिमंडळ पक्षात उभी फूट पडली. त्यानंतर पक्षातील आणखी २४ आमदार त्यांना जाऊन मिळाले. पाठोपाठ शिंदे यांनी गुवाहाटी (आसाम) शहर गाठलं. गुवाहाटीत काही वाटाघाटी केल्यानंतर ते मुंबईत परतले आणि त्यांनी मूळ शिवसेना पक्षावर दावा केला. तसेच भाजपाबरोबर हातमिळवणी करून राज्यात सत्तास्थापन केली. या घटनेला आता दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या दोन वर्षांत शिवसेनेच्या दोन गटांमध्ये परस्परांवर कुरघोडीचे अनेक प्रयत्न झाले. निवडणूक आयोगाने मूळ शिवसेना पक्ष आणि पक्षाचं धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या



गटाला दिलं. पाठोपाठ विधानसभेच्या अध्यक्षांनीही निवडणूक आयोगाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केलं. परिणामी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचं नाव बदलण्यात आलं. तसेच त्यांना मशाल या चिन्हावर निवडणूक लढवावी लागली.

दरम्यान, शिवसेनेतील फुटीला आणि राज्यातील नव्या सरकारला दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे, विचार.. विकास.. आणि विश्वास राज्यात सत्तेवर आलेल्या सामान्यांच्या सरकारला आज दोन वर्षे होत आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा विचार, राज्याच्या विकासाचा ध्यास आणि सामान्यांचा विश्वास यांच्या बळावर महायुती सरकारने दोन वर्षांची यशस्वी वाटचाल केली आहे.

शिंदे यांनी म्हटलं आहे की या दोन वर्षांच्या काळात देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं भक्कम पाठबळ लाभलं. उपमुख्यमंत्री देवेंद्रज फडणवीस, अजित पवार आणि सर्व सहकाऱ्यांची समर्थ साथ लाभली. राज्यातील जनतेनं दिलेलं प्रेम, शिवसैनिकांची साथ आणि महायुतीमधील पक्षांचा उत्तम समन्वय यामुळे लोकहिताची शेकडो कामे मार्गी लागली. राज्यातील शेतकरी, कष्टकरी, महिला, ज्येष्ठ आणि युवकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू उमटवता आले. आम्ही घेतलेल्या निर्णयावर राज्यातील जनतेनेही विश्वासाची मोहर उमटवत साथ दिली, याचा अभिमान आहे आणि त्यातून निर्माण झालेल्या जबाबदारीचे भानही आहे.

एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या संस्कारामुळेच हे सगळं घडू शकलं. आम्हाला हेच विचार आणि संस्कार घेऊन पुढील वाटचाल करायची आहे. विकास साधायचा आहे आणि विश्वास वृद्धिंगत करायचा आहे. गेल्या दोन वर्षांत पाठीशी ठाम उभे राहिलेल्या प्रत्येक व्यक्तीचे ऋण व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाही. प्रत्येक घटकाचे अंतःकरणापासून आभार. जय हिंद. जय महाराष्ट्र.

## राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

■ जागा : ४८
■ पदाचे नाव तपशील:
१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc. (CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/PWD: 175/-
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

## सीमा सुरक्षा दल

■ पद क्र.
१ सब इंस्पेक्टर (Master)
२ सब इंस्पेक्टर (Engine Driver)
३ हेड कॉन्स्टेबल (Master)
४ हेड कॉन्स्टेबल (Engine Driver)
५ कॉन्स्टेबल (Crew)
६ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Mechanic (Diesel/Petrol Engine)
७ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Electrician
८ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) -C Technician
९ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Electronics
१० हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Machinist
११ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Carpenter
१२ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Plumber
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 2nd क्लास मास्टर प्रमाणपत्र
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 1st क्लास इंजिन ड्रायव्हर प्रमाणपत्र
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) सेरंग प्रमाणपत्र
पद क्र.४: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 2nd क्लास इंजिन ड्रायव्हर प्रमाणपत्र
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण (ii) 265 HP च्या खाली बोट चालवण्याचा एक वर्षाचा अनुभव (iii) कोणत्याही मदतीशिवाय खोल पाण्यात पोहणे माहित असले पाहिजे.
पद क्र.६ ते १२: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI डिप्लोमा Motor Mechanic (Diesel/Petrol Engine), Electrician, AC Technician, Electronics, Machinist, Carpentry Plumbing
■ वयाची अट: SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ २: २२ ते २८ वर्षे
पद क्र.३ ते १२: २० ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: SC/ST: फी नाही
पद क्र.१ २: General/OBC/EWS: २००/-
पद क्र.३ ते १२: General/OBC/EWS: १००/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०१ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM²)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

## राष्ट्रीय केमिकल्स फर्टिलायझर्स लि.

■ पदाचे नाव तपशील: १ मॅनेजमेंट ट्रेनी केमिकल/मेकॅनिकल / इलेक्ट्रिकल/इन्स्ट्रुमेंटेशन /सिव्हिल/फायर/CC लॅब/ इंडस्ट्रियल/मार्केटिंग/ HR/ ट्रेनी एडमिन/कॉर्पोरेट कम्युनिकेशन १५८
■ शैक्षणिक पात्रता: ६०% गुणांसह B.E./B.Tech. (केमिकल/मेकॅनिकल/इलेक्ट्रिकल/इन्स्ट्रुमेंटेशन/सिव्हिल) किंवा डिप्लोमा किंवा कोणत्याही शाखेतील पदवी+MBA
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: मुंबई
■ Fee: General/OBC/EWS: 1000/- SC/ST/ExSM²/महिला:फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०१ जुलै २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.rcfltd.com/

## कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट मॅनेजर (Legal)
२ असिस्टंट मॅनेजर (Official Language)
३ मॅनेजमेंट ट्रेनी (Mktg)
४ मॅनेजमेंट ट्रेनी (Accounts)
५ ज्युनियर कमर्शियल एक्झिक्युटिव
६ ज्युनियर असिस्टंट (General)
७ ज्युनियर असिस्टंट (Accounts)
८ ज्युनियर असिस्टंट (Hindi Translator )
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.२: (i) ५०% गुणांसह हिंदी विषयात पदव्युत्तर पदवी (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.३: MB- (Agri Business Management/Agriculture)
पद क्र.४: CA/CMA
पद क्र.५: ५०% गुणांसह B.Sc (Agriculture) SC/ST/PWD:४५% गुण
पद क्र.६: ५०% गुणांसह B.Sc (Agriculture) SC/ST/PWD:४५% गुण
पद क्र.७: ५०% गुणांसह B.Com
पद क्र.८: इंग्रजी विषयासह हिंदी विषयात पदवी.
■ वयाची अट: १२ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ २: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.३ ते ८: १८ ते ३० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १५००/- SC/ST/PWD/ExSM²: ५००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०२ जुलै २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट: https://cotcorp.org.in/?-spx-utoDetectCookieSupport=1

## बँक ऑफ बडोदा

■ जाहिरात क्र.: BOB/HRM/REC/-DVT/२०२४/०४ BOB/HRM/REC/-DVT/2024/05
■ पदाचे नाव तपशील:
BOB/ HRM/REC/ ADVT/२०२४/०४ १ Regular Posts (मॅनेजर आणि इतर पदे) ४५९
BOB/ HRM/REC/ -DVT/२०२४/०५ २ Contract Posts (मॅनेजर आणि इतर पदे) १६८
■ शैक्षणिक पात्रता: (i) CA/CMA/CS/CF-/कोणत्याही शाखेतील पदवी/ इ.Tech/ B.E./ M.Tech/ M.E./ MCA (ii) अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ३०/३५/३८/४०/४२/४५ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 600/- SC/ST/PWD/महिला: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०२ जुलै २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ वेबसाईट https://www.bankofbaroda.in/

## भंडारा ऑर्डनन्स फॅक्टरी

■ जागा : १५८
■ पदाचे नाव तपशील:
१ कार्यकाळ आधारित DBW (डेंजर बिल्डिंग वर्कर) १५८
■ शैक्षणिक पात्रता: AOCP ट्रेड (NCTVT) चे माजी प्रशिक्षणार्थी ज्यांना ऑर्डनन्स फॅक्टरी प्रशिक्षण / लष्करी दारूगोळा आणि स्फोटकांच्या निर्मिती आणि हाताळणीचा अनुभव आहे. आणि पूर्वीच्या आयुध निर्माणी मंडळाच्या आयुध कारखान्यांमध्ये प्रशिक्षण घेतलेले AOCP ट्रेडचे एक्स-ट्रेड अप्रेंटिस. किंवा NCTVT (आता NCVT) द्वारे जारी केलेले NAC/NTC प्रमाणपत्र असलेले उमेदवार आणि सरकारशी संलग्न असलेल्या सरकारी/खाजगी संस्थेकडून AOCP ट्रेडमध्ये आणि सरकारी ITI मधून AOCP असलेले उमेदवार विचारात घेतले जातील.
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १८ ते ३५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: भंडारा
■ फी : फी नाही.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Chief General Manager, Ordnance Factory Bhandara District: Bhandara Maharashtra, Pin-441906
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाइट https://ddpdoo.gov.in/units/OFBA

### मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांचा मोठा प्रतिसाद

# आज वरची १७ कोटींची रेकॉर्ड ब्रेक वसुली

पनवेल : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महानगरपालिकेकडून सुधारित देयकांचे वाटप केल्यानंतर, माननीय आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार नागरिकांना बिले भरणे सोयीचे व्हावे यासाठी खारघर मधील ३६ सोसायटीमध्ये दिनांक २२ जून २०२४ पासून विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या आवाहनाला मालमत्ता धारकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. दिनांक २९ जून रोजी एका दिवसात सुमारे १७ कोटी इतकी आज वरची रेकॉर्ड ब्रेक वसुली झाली आहे. याकरिता शनिवार रविवारी देखील महापालिकेचे मुख्यालय व प्रभाग कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते. या सर्व ठिकाणी मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केले असल्याचे दिसून आले.

पनवेल महानगरपालिकेमार्फत आकारण्यात आलेल्या पूर्वलक्षी मालमत्ता कराबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या स्पेशल लीव्ह पिटीशनच्या अंतरिम निकाल दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी लागला आहे. सदर अंतरिम निकालानुसार करनिर्धारण वर्ष २०२१-२२ पासून मालमत्ता कराच्या सर्व थकीत रकमेचा भरणा दोन महिन्यांच्या आत करण्याचे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले होते. त्यानूसार नागरिकांच्या सोयीसाठी दिनांक २२ जून पासून खारघर मधील ३६ सोसायटीमध्ये

ज्या मालमत्ताधारकांना अद्यापही सुधारित मालमत्ता कर देयक प्राप्त झालेले नाही त्यांनी ऑनलाइन पोर्टल (संकेतस्थळ) किंवा महानगरपालिका कार्यालयास भेट देऊन सुधारित देयक उपलब्ध करून घ्यावे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी "PMC TAX APP" मोबाईल प विकसित केले आहे. तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. याचा लाभ मालमत्ता धारकांनी घ्यावा. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.



विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांबरोबर चारही प्रभाग कार्यालये, मुख्यालय या ठिकाणी मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांची गर्दी दिसून आली. या आर्थिक वर्षात आजवर एकुण १९६ कोटी मालमत्ता कर वसुली झाली आहे. दिनांक २२ जून पासून चारही प्रभाग, मुख्यालयातून रोज सुमारे सरासरी ६ कोटींचा भरणा होत होता.यामध्ये दिनांक २९ जून ला मात्र एका दिवसात १७ कोटीची उच्चांकी वसुली झाली असून, आजपर्यंत ही एका दिवसात होणारी सर्वाधिक वसुली आहे.

सन २०२४-२५ च्या चालू कर मागणीवर दिनांक ३० जून अखेर देण्यात आलेली ५ टक्के इतकी सूट दिनांक १५ जुलै पर्यंत मुदतवाढ करण्यात आली असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. याशिवाय मालमत्ता कराचा भरणा ऑनलाईन केल्यास एकूण २ टक्के इतकी सूट दिली जात असल्याने नागरिकांनी त्वरित कर भरणा करून महानगरपालिकेस सहकार्यकरावे तसेच पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासास हातभार लावावा असे आवाहन करविभागाचे सहायक आयुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

### दक्षिण आफ्रिका ठरली पुन्हा चोकर्स

# भारत वर्ल्ड चॅम्पियन




बार्बाडोस : हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह आणि अर्शदीप सिंह यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने टी२० विश्वचषकावर नाव कोरले आहे. अखेरच्या चार षटकांमध्ये भारतीय गोलंदाजांनी सामना फिरवला. २४ चेंडूवर दक्षिण आफ्रिकेला २६ धावांची गरज होती. त्यावेळी हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह, अर्शदीप यांनी भेदक मारा केला. त्याला जोड सूर्यकुमार यादवच्या फिल्डिंगची मिळाली. सूर्यकुमार यादवने मोक्याच्या क्षणी डेविड मिलर याचा झेल घेतला. भारतीय संघाने ११ वर्षानंतर अखेर आयसीसी चषकावर नाव कोरत भारत विश्वविजेता बनला. टी२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव केला. सामनावीर पुरस्कार विराट कोहलीला तर मालिकावीर पुरस्कार बुमराह याला देण्यात आला.

भारताने १७७ धावांच्या आव्हानाचा यशस्वी बचाव केला. बार्बाडोसच्या मैदानात भारताने इतिहास रचला. २००७ नंतर भारतीय संघाने टी२० विश्वचषकावर नाव कोरलेय. विराट कोहली आणि अक्षर पटेल यांनी फलंदाजीमध्ये शानदार कामगिरी केली. गोलंदाजीमध्ये हार्दिक पांड्या, बुमराह आणि अर्शदीप यांनी शानदार गोलंदाजी केली. रोहित शर्मा २००७ आणि २०२४ विश्वचषक जिंकणारा एकमेव खेळाडू ठरला आहे. यावेळी रोहित शर्मा, हार्दिक पंड्यासारखे भारताच्या सर्वच खेळाडूंच्या डोळ्यातून विजयाश्रू आले.

भारताच्या गोलंदाजांनी भेदक मारा करत सामना फिरवला. अर्शधीप सिंह याने ४ षटकात २० धावांच्या मोबदल्यात दोन फलंदाजांना तंबूत पाठवले. जसप्रीत बुमराहने आपल्या षटकात फक्त १८ धावा खर्च करत दोन विकेट घेतल्या आहेत. हार्दिक पांड्याने ३ षटकात २० धावांच्या मोबदल्यात ३ विकेट घेतल्या. अक्षर पटेल याला एक विकेट मिळाली.

१७७ धावांच्या आव्हानाचा बचाव करताना भारतीय गोलंदाजांनी शानदार सुरुवात केली. रीजा हेंड्रीक्स आणि कर्णधार एडन माक्रम लवकर तंबूत परतले. हेंड्रिक्स ४ आणि माक्रम चार धावा काढून तंबूत परतले होते. आफ्रिका १२ धावांवर दोन बाद अशी स्थिती होती. पण त्यानंतर स्टब्स आणि डी कॉक यांनी आफ्रिकेच्या डावाला आकार दिला.दोघांनी चौफेर फटकेबाजी करत धावसंख्या वाढवली. अक्षर पटेल याने स्टब्सचा अडथळा दूर करत भारताला यश मिळवून दिले. पण त्यानंतर क्लासेन यानं डिकॉकच्या साथीने धावसंख्या वाऱ्याच्या वेगानं वाढवली. क्लासाने आणि डी कॉक यांनी वादळी फलंदाजी करत सामना फिरवला. अर्शदीप सिंह याने क्विंटनला बाद करत विजयाचा दरवाजा तोडला. त्यानंतर हार्दिक पांड्याने धोकादायक क्लासेन याचा अडथळा दूर केला. क्लासेन यानं फक्त २७ चेंडूमध्ये ५२ धावांची खेळी केली. क्विंटन डी कॉक याने ३१ चेंडूत ३९ धावा जोडल्या. स्टब्स ३१ धावा काढून बाद झाला. मिलरने २१ धावांचे योगदान दिले. अखेरच्या २४ चेंडूत आफ्रिकेला २६ धावांची गरज होती. हार्दिक पांड्याने भेदक मारा करत फक्त चार दावा दिल्या. क्लासेन याला या षटकात तंबूचा रस्ता दाखवला. त्यापुढील षटकात जसप्रीत बुमराहने फक्त दोन धावा दिल्या. १९ व्या षटकात अर्शदीप सिंह याने फक्त चार धवाा खर्च केल्या. अखेरच्या षटकात हार्दिक पांड्याने १६ धावांचा यशस्वी बचाव केला.

## जडेजानेही जाहीर केली टी२० क्रिकेटमधून निवृत्ती

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेवर रोमहर्षक विजय मिळवत विश्वचषकावर आपलं नाव कोरलं. तब्बल ११ वर्षांचा आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवला. या विजयानंतर टीम इंडियाच कर्णधार रोहित शर्मा आणि स्टार फलंदाज विराट कोहली या दोघांनीही टी-२० क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. यानंतर आज भारतीय संघाचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा यानेही टी-२० आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. इंस्टाग्राम पोस्टद्वारे त्यांनी ही माहिती दिली.
इंस्टाग्राम पोस्टमध्ये जडेजाने लिहिले आहे की, माझ्या मनापासून, मी टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांना अलविदा म्हणतो. मी माझ्या देशासाठी नेहमीच माझे सर्वोत्तम दिले आहे आणि इतर फॉरमॅटमध्येही असेच करत राहीन. टी२० विश्वचषक जिंकून माझ्या टी२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे एक स्वप्न पूर्ण झाले, आठवणी, उत्साह आणि अतुलनीय पाठिंबा यासाठी धन्यवाद.

## कोहलीचा धक्कादायक निर्णय

टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली याने मोठी घोषणा केली आहे. हा माझा शेवटचा वर्ल्ड कप आहे, असं विराट कोहली फायनलनंतर बोलताना म्हणाला. त्यामुळे आता विराट कोहलीच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.




## 'भारतीय संघावर गर्व आहे'

*भारतीय संघाला मिळालेल्या भव्य विजयासाठी मी संपूर्ण देशवासियांकडून त्यांचं अभिनंदन करतो. १४० कोटी देशातील जनतेला त्यांच्यावर गर्व आहे. हा एक ऐतिहासिक विजय आहे. भारतीय संघाने विश्वचषक जिंकण्याबरोबरच संपूर्ण देशवासियांची मने जिंकली आहेत, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान मोदी यांनी दिली.*

## सूर्याने घेतला अफलातून झेल

टी २० वर्ल्ड कप २०२४ च्या फायनलच्या मॅचकडे कोट्यवधी भारतीयांच्या नजरा लागलेल्या असताना शेवटच्या ओव्हरमध्ये दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी १६ धावांची गरज होती. रोहित शर्मानं बॉल हार्दिक पांड्याच्या हातात दिला होता. स्ट्राईकवर आक्रमक फलंदाज डेव्हिड मिलर होता. डेव्हिड मिलरनं पहिलाच बॉल सीमारेषेबाहेर मारण्याचा प्रयत्न केला. बाऊंड्रीवर सूर्यकुमार यादव होता. सूर्यकुमार यादवनं धावत येत कॅच पकडला. सीमारेषेच्या आता जाणार इतक्यात सूर्यकुमार यादवनं बॉल हवेत टाकला पुन्हा बाहेर पळत येत कॅच पकडला. इथं मॅच खऱ्या अर्थानं भारताच्या बाजूनं फिरली.

कल्याण-डोंबिवली महापालिका परिक्षेत्रातील अनधिकृत

# बार आणि ढाब्यांवर निष्कासनाची कारवाई सुरूच

**कल्याण : कल्याण-डोंबिवली महापालिका परिक्षेत्रातील अनधिकृत बार आणि ढाब्यांवर निष्कासनाची कारवाई सुरू असून ६/फ प्रभागाचे सहा. आयुक्त भारत पवार यांनी डोंबिवली (पूर्व) शेलार नाका येथील शिल्पा बार वरील निष्कासनाची कारवाई पूर्ण केली असून, सदरचे बांधकाम भुईसपाट करण्यात आले.**

तसेच ७/ह प्रभागात सहा. आयुक्त राजेश सावंत यांनी डोंबिवली (पश्चिम) परिसरातील आई गावदेवी ढाबा, दर्या किनारा ढाबा, साईकृपा ढाबा, जय मल्हार ढाबा, तारांगण ढाबा, हिरवाई ढाबा, चूल ढाबा, आई एकवीरा ढाबा, मया ढाबा, तुळसा ढाबा व एमएच-१९-खांदेश ढाबा असे एकूण ११अनधिकृत ढाब्यांवर निष्कासनाची धडक कारवाई काल दिवसभरात केली. ही कारवाई विष्णू नगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार व इतर कर्मचारी, महापालिका पोलीस अधिकारी व कर्मचारी, ७/ह अनधिकृत बांधकाम विभागाचे अधीक्षक, फेरीवाला हटाव पथकाचे कर्मचारी यांच्या मदतीने आणि ठेकेदार यांच्याकडील यंत्रसामुग्रीच्या साह्याने करण्यात आली.

९/आय प्रभागातही किशोर ठाकूर यांनी कशिश बार अँड रेस्टॉरंट व रंगीला बार अँड रेस्टॉरंट वरील निष्कासनाची कारवाई पूर्ण केली असून, सदरचे बांधकाम भुईसपाट करण्यात आले.

१०/इ प्रभागात सहा. आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी किंग ऑर्केस्ट्रा बारवरील निष्कासनाची कारवाई पूर्ण करून सदर बार भुईसपाट करण्यात आला.

महापालिकेच्या अ प्रभागातही नंदप रोड, टिटवाळा परिसरातील तीन धाब्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली तसेच शाळा परिसरातील तंबाखू, गुटखा इत्यादी विक्री करण्यात येणाऱ्या चार टपऱ्या जेसीबी व डंपर यांच्या साह्याने उचलण्यात आल्या.



मुंबई-नाशिक महामार्गावर खड्डे

# मुख्य सचिवांचा लोकलने प्रवास

कसारा : मुंबई - नाशिक महामार्गावर खड्ड्यांचे साम्राज पसरले आहे. तर दुसरीकडे महामार्गावरील आसनगाव हद्दीत संथ गतीने रेल्वे ब्रिजचे काम सुरू आहे. तसेच वशिंदमध्ये चालू असलेल्या उड्डाण पुलाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. महामार्गावरील चेरपोलीघाट, शहापूर, आसनगाव ते वशिंदपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. याचा फटका रुग्णवाहिका, स्कूलबसला बसत आहे. दरम्यान, याचा फटका राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना देखील बसला. त्यामुळे त्यांनी आज (दि.३०) कसारा रेल्वे स्थानकावरून लोकलने प्रवास करणे पसंद केले. नाशिकहून येत असताना त्यांनी आपला ताफा कसारा रेल्वे स्थानका कडे वळवला. आणि कसाराहून मुंबईसाठी दुपारी दीडची लोकल पकडली.



## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणा हवेतच

*मुंबई - नाशिक महामार्गांवरील कामाची २८ जुलै २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित यंत्रणांना आदेश देऊन घटनास्थळाची पाहणी केली होती. मात्र, त्यांचे आदेश आजही कागदावरच असल्याचे पहिल्याच पावसात दिसून आले. मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून चालकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. मुख्यमंत्र्यांचे आदेश कागदावरच असल्याची चर्चा वाहन चालक करताना दिसत आहे.*

## मुख्यमंत्र्यांच्या सुचनेला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून केराची टोपली

टास्क फोर्सने नियमित बैठका घेऊन खड्डेमुक्तीच्या मोहिमेला गती द्यावी. वाहतुकीच्या नियंत्रण-नियमनाकडेही लक्ष द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी त्या बैठकीत दिले होते. अवजड वाहने व मालवाहतुकीच्या वाहनांसाठी वेळेचे नियोजन करा. हाईट बॅरियर लावण्यात यावीत. महामार्गांच्या परिसरातील अतिक्रमण हटवण्यात यावीत. वाहतूक नियमनासाठी वॉर्डनची नियुक्ती करण्यात यावी, अशा अनेक सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या होत्या. परंतु, मुख्यमंत्र्यांच्या या सुचनेला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने केराची टोपली दाखवली.

## विरुद्ध दिशेने वाहने घातल्याने दोन्ही लेन जाम

*गेल्या ८ ते १० वर्षापासून मुंबई- नाशिक मार्गमार्गाचे आठ पदरी रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, हे काम संथगतीने सुरू आहे. नाशिक, ठाणे, मुंबई या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाहतूक कोंडीचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत आहे. त्यातच नाशिक वरून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या काही वाहनचालकांनी विरुद्ध दिशेने वाहने घातल्याने दोन्ही लेन पूर्ण जाम होत आहे.*

## जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मुंबई- नाशिक महामार्गाचे काम वेळेत पूर्ण व्हावे याकडे लक्ष द्यावे. या कामात विलंब होऊ नये, रस्त्याच्या कामात सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत खबरदारी घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २८ जुलै २०२३ संबंधित यंत्रणांना दिले होते. तसेच कामाला गती द्या, दर्जेदार काम होण्याकडे लक्ष द्या, वाहतुकीचे नियमन करा तसेच खड्डेमुक्तीसाठी ठाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स यापूर्वीच स्थापन केला होता.

## ठेकेदार, पोट ठेकेदारांना ५ कोटींचा दंड

मुंबई- नाशिक महामार्गाच्या निकृष्ट कामामुळे ठेकेदार, पोट ठेकेदार यांना मागील वर्षी ५ कोटींचा दंड केला होता. परंतु दंड वसूल न करता त्याच ठेकेदारांना अभय देण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण करीत असल्याचा आरोप होत आहे. तर खड्ड्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी सोडविताना पोलिसांची मात्र दमछाक होत आहे.

# शहापूरमध्ये परवानगीशिवाय मुलाच्या गुप्तांगाची शस्त्रक्रिया

शहापूर : शहापूर उपजिल्हारुग्णालयात एका नऊ वर्षीय मुलाच्या पायाच्या शास्त्रक्रियेबरोबरच त्याच्या गुप्तांगाची शस्त्रक्रिया पालकांच्या परवानगीशिवाय करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे रुग्णाच्या आई - वडिलांनी चिंता व्यक्त केली आहे. दरम्यान, याबाबत नेमण्यात आलेल्या जिल्हास्तरीय चौकशी समितीचा अहवाल गुलदस्त्यात आहे. शहापुर तालुक्यातील सावरोली येथील नऊ वर्षीय आदिवासी मुलाच्या पायाला संसर्ग (इन्फेक्शन) झाले होते. त्याची शस्त्रक्रिया करण्यासाठी १५ जून रोजी त्याला शहापूर उपजिल्हारुग्णालयात दाखल करण्यात आले होते. १७ जूनला त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रिया करताना संबंधित डॉक्टरने पायाची शस्त्रक्रिया करण्याबरोबरच गुप्तांगाची शस्त्रक्रिया केल्याचा आरोप मुलाच्या आईने केला आहे. या गुप्तांगाची शस्त्रक्रिया करण्याबाबत संबंधित डॉक्टरने कुठल्याही प्रकारची आगाऊ सूचना किंवा आमची परवानगी घेतली नव्हती, असा आरोपही त्यांनी केला आहे. या शस्त्रक्रियेमुळे मुलाच्या आई - वडिलांनी चिंता व्यक्त केली असून याबाबत चौकशीची मागणी केली आहे. तद्नंतर याप्रकरणी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने दोन दिवसांपूर्वी शहापूर उपजिल्हारुग्णालयाला भेट देऊन चौकशी केली असून त्याबाबतचा अहवाल गुलदस्त्यात आहे. चौकशी अहवालानंतर काय कार्यवाही होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या संदर्भात डॉ. अशिलाक शिंदे यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही. याबाबत रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधला असता, त्यांनी डॉ. अशिलाक शिंदे यांच्या नातेवाईकाचा मृत्यू झाल्याने ते अंत्यविधीसाठी गावी गेल्याचे सांगितले.

# लोन मंजूर करून देणाऱ्या एजंटनेच केली ४.८८ लाखांची फसवणूक

ठाणे : एका बँकेतून लोन मंजूर करून अधिक लोणची गरज असल्याने दुसऱ्या बँकेतून सडे सहा लाखाचे कर्ज मंजूर करून तक्रारदार विपुल बामणे याना दिले. तर सुरुवातील काढलेल्या लोणची रक्कम बँकेत भरण्यासाठी घेऊन ४ लाख ८८ लाख ७२० रुपये घेऊन अपहार करीत फसवणूक केल्याची तक्रार वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

तक्रारदार विपुल राजेंद्र बामणे(३०) रा. रुम नंबर १२०६, इम्पेरीयल टॉवर, ऐ२. निर्मल नगरी, दिवा, ठाणे. यांचे केसर्व बी.पी.ओ. प्रा.लि. अ विंग, आठवा माळा, आषर आयटी पार्क, वागळे इस्टेट, ठाणे कार्यालय आहे. त्यांना घराच्या कामासाठी साडे सहा लाखाचे लोन ची गरज होती. नेटवर सर्च केल्यानंतर लोन काढून देण्यासाठी त्यांचा संपर्क वैभव मनोहर वारंग यांच्याशी झाला. वारंग याने तक्रारदार बामणे याना १९ जानेवारी, २०२३ रोजी ५ लाखाचे लोन मंजूर करून दिले. त्याची ४ लाख ८८ हजार ७२० रुपये तक्रारदार यांच्या बँक खात्यावर टाकले. मात्र तक्रारदार याना पाच लाख नको सडे सहा लाख पाहिजे होते. तेव्हा एजंट वैभव वारंग याने साडे सहा लाखाची गरज असल्याचे सांगितले. ते ही वैभव याने मंजूर करून दिले. व पहिल्या लोणची रक्कम ही तक्रारदार बामणे यांच्याकडून घेतली आणि तिचा अपहार केला. याबाबत तक्रारदार याना माहिती मिळताच त्यांनी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात एजंट वैभव वारंग याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

# मुंबई मराठी पत्रकार संघाच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचा ऐतिहासिक विजय

मुंबई : मुंबई मराठी पत्रकार संघाच्या निवडणुकीत संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनेलने ऐतिहासिक विजय मिळवला. पत्रकार संघाच्या इतिहासात इतक्या मोठ्या फरकाने सर्व १४ च्या १४ जागा जिंकण्याचा विक्रम परिवर्तन पॅनेलने केला. परिवर्तन पॅनेलचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आणि कोषाध्यक्ष जगदीश भोवड या तिघांनीही एकूण ४८६ मतांपैकी प्रत्येकी ३०० हून अधिक मतं मिळवत दणदणीत विजय मिळवला.

उपाध्यक्षपदाच्या दोन जागांसाठी झालेल्या सर्वाधिक चुरशीच्या लढतीत परिवर्तन पॅनेलच्या स्वाती घोसाळकर आणि राजेंद्र हुंजे यांनी बाजी मारली. कार्यकारिणीच्या ९ जागांवरही परिवर्तन पॅनेलने झेंडा फडकावला. परिवर्तन पॅनेलच्या कार्यकारिणी पदावरील प्रत्येक विजयी उमेदवाराने दोनशे पार मते मिळवली. प्रतिस्पर्धी समर्थ पॅनेलच्या एकाही




उमेदवाराला दोनशे मतांचा टप्पा गाठता आला नाही.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुकृत खांडेकर हे समर्थ पॅनेलतर्फे अध्यक्षपदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. या लढतीत संदीप चव्हाण यांनी तब्बल ३१६ मते खेचून घेत १५६ मतांच्या फरकाने विजय मिळवला. खांडेकर यांना १६० मते मिळाली.

कार्यवाह पदाच्या लढतीत परिवर्तन पॅनेलच्या शैलेंद्र शिर्केनी ३०७ मते मिळवत समर्थ पॅनेलच्या दीपक परब (१६६) यांचा पराभव केला. कोषाध्यक्षपदाच्या लढतीत जगदीश भोवड यांनी सर्वाधिक २१८ मतांच्या फरकाने सारंग दर्शने (१६६) यांचा पराभव केला.

उपाध्यक्षपदाच्या दोन जागांवर परिवर्तन पॅनेलच्या ज्येष्ठ पत्रकार स्वाती घोसाळकर यांनी २८८ मते तर राजेंद्र हुंजे यांनी २२५ मते मिळवत बाजी मारली. समर्थ पॅनेलच्या उदय तानपाठक यांना २०८ मते मिळाली तर विष्णू सोनवणे यांना २०३ मते मिळाली. कार्यकारिणी पदाच्या लढतीत दिवाकर शेजवळ आणि देवेंद्र भोगले यांना सर्वाधिक २८२ मते मिळाली. नाणेफेक करून त्यातील पहिल्या क्रमांकासाठी भोगले यांची वर्णी लागली.



भारताने विश्वचषक जिंकल्यानंतर देशभरात जल्लोषाचे वातावरण होते. ठाण्यातील विविध भागात क्रिकेट प्रेमींकडून विजयाचा जल्लोष करण्यात आला. (छाया : मनोज सिंह)

# कल्याणमध्ये नांदिवलीतून अल्पवयीन गुराख्याचे अपहरण

कल्याण : कल्याण पूर्वेतील नांदिवली तर्फ गाव हद्दीतून गायी चारण्यासाठी गेलेल्या एका १५ वर्षांच्या गुराख्याचे अज्ञात इसमांनी गुरुवारी सकाळी अपहरण केले आहे. सकाळी गायी चारण्यास घेऊन गेलेला गुराखी घरी का आला नाही म्हणून कुटुंब प्रमुखाने चौकशी केली तेव्हा त्यांना गुराखी गायब असल्याचे आढळले.

शिवा बिचप्पा कुरूवलम (१५) असे अपहरण झालेल्या गुराख्याचे नाव आहे. शिवा कुरूवलम याला कोणीहा वारस नसल्याने आणि तो अनाथ असल्याने कल्याण पूर्वेतील नांदिवली तर्फ गावातील भास्कर बारकू ढोणे (४८) यांनी या मुलाचा सांभाळ केला. त्याला मोठे केले. भास्कर यांच्याकडे गोधन आहे. या गोधनातून ते दुग्ध व्यवसाय करतात. आपल्या गायी सांभाळण्यासाठी, चरायला नेण्यासाठी भास्कर ढोणे शिवा याला गाव परिसरातील माळरानावर पाठविते होते. नेहमीप्रमाणे गुरुवारी सकाळी शिवा गायी घेऊन नांदिवली गाव हद्दीतील स्मशानभूमीजवळील माळरानावर गेला. गायी चरत असताना शिवा याच भागातील खडकाळ भागावर बसून राहत असे.

गुरुवारी सकाळी गायी चारत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने शिवा कुरूवलम याला फूस लावून पळवून नेले. शिवा नियमित अकरा वाजेपर्यंत गायी घरी घेऊन येत होता. पण तो घरी आला नाही. म्हणून कुटुंब प्रमुख भास्कर ढोणे नांदिवली भागातील माळरानावर गेले. तेव्हा त्यांना तेथे त्यांच्या गायी चरत असल्याचे दिसले. पण परिसरात शिवा त्यांना आढळला नाही. त्यांनी परिसरात शिवाचा शोध घेतला. तो आढळून आला नाही. शिवाच्या अज्ञानपणाचा गैरफायदा घेऊन त्याचे कोणीतरी अपहरण केले असल्याचा संशय व्यक्त करून ढोणे यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक एस. एम. माने तपास करत आहेत.

# कल्याणमधील अटाळीत अल्पवयीन कार चालकाची मोटीराला धडक

कल्याण : कल्याणमधील अटाळी भागात शुक्रवारी मध्यरात्री एका अल्पवयीन मुलाने कार चालविताना समोरून येत असलेल्या मोटारीला जोराची धडक दिली. या धडकेत समोरील कारमधील चालक किरकोळ जखमी झाला. या धडकेनंतर अल्पवयीन मुलाने आपल्या साथीदारांना बोलावून समोरील कार चालकाला शिवीगाळ करत बेदम मारहाण केली.

ही अपघाताची माहिती समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर खडकपाडा पोलिसांनी अल्पवयीन कार चालकाचे वडील राजाराम चौधरी आणि त्यांच्या अल्पवयीन मुलावर स्वताहून गुन्हा दाखल केला. या प्रकरणात तक्रार दाखल करण्यासाठी कोणीही पुढे न आल्याने तक्रार दाखल करण्यात आली नव्हती, अशी भूमिका पोलिसांनी घेतली. या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे यांनी माध्यमांना दिली.

पोलिसांनी सांगितले, अल्पवयीन मुलगा शुक्रवारी मध्यरात्री ब्रिझा कार घेऊन कल्याणकडून अटाळीकडे सुसाट वेगाने घरी चालला होता. अटाळी चौकात आरोपी मुलाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार समोरून येत असलेल्या किया कारला जोराने धडकली. किया कारचा चालक यात किरकोळ जखमी झाला. आरोपी मुलगा आणि किया कारमधील चालक यांच्यात अपघातावरून वाद झाला. चूक अल्पवयीन मुलाची असताना तो समोरील कार चालकाला दटावणी करू लागला. यावेळी आरोपी मुलाने आपल्या साथीदारांना घटनास्थळी बोलावून घेतले. किया कारमधील चालकाला त्यांची कोणतीही चूक नसताना मारहाण केली.

आरोपी मुलाचे वडील एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते असल्याची चर्चा आहे. पुण्यासारखे प्रकरण कल्याणमध्ये घडल्याने पोलिसांनी अल्पवयीन मुलासह त्याच्या वडिलांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी कल्याणमधील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# मृत्यूचा बनाव रचून विमा कंपनीकडून उकळले ७० लाख रुपये

डॉक्टरसह चौघाजणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल

भाईंदर : बनावट मृत्यू दाखला तयार करून एका कुटुंबियाने विविध विमा कंपनीकडून जवळपास ७० लाख रुपये उकळल्याचे प्रकरण समोर आले आहे. याबाबत भाईंदर पोलिसांनी एका डॉक्टरसह पै कुटुंबातील चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदरच्या राई गावात राहणाऱ्या पै कुटुंबीयानी देखील केला.यातील एकूण ६९ लाख ६० हजाराची रक्कम त्यांना मिळाली. उर्वरित रक्कमही त्यांना मिळणार होती.

दरम्यान कागदपत्राची पडताळणी करत असताना बनावट कागदपत्रे असल्याची बाब एका विमा कंपनीच्या निदर्शनात ही बाब आली. त्यामुळे कंपनीकडून या संदर्भात भाईंदर पोलिस ठाण्यात तक्रार



आयासीआयसीआय लाईट इन्शुरन्स,मॅक्स लाईफ, भारतीय एक्स, फ्युचर जर्नल आणि एचडीएफसी इन्शुरन्स अशा विविध कंपनीकडून जीवनविमा काढला होता. कंपनीकडून पैसे उकळण्यासाठी त्यांनी चक्क कांचन पै ही महिला मयत झाली असल्याचा बनाव रचला. तिच्या मृत्यूच्या दाखला तयार करण्यासाठी ओळखीच्याच डॉक्टर आशुतोष यादव यांची मदत घेऊन कागदपत्रे तयार केली. या कागदपत्राच्या आधारे त्यांनी विविध कंपनीकडे एकूण १ कोटी १० लाखाचा दावा देण्यात आली होती.

त्यानुसार पोलीस भाईंदर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक शिंदे यांनी केलेल्या तपासात पै कुटुंबियांनी विविध कंपनीलाठिकाणाचे बनावट मृत्यू दाखले दिले असल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणात कांचन रोहित पै, रोहित पै, धनराज पै यांच्यासह बनावट दाखला देणारा डॉक्टर आशुतोष यादव विरोधात कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१ आणि १२०(बी )अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चारही आरोपी फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहे.

कोकण पदवीधर, मुंबई शिक्षक व पदवीधर मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीच्या मतमोजणीचे दुसरे प्रशिक्षण संपन्न

# राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी केली मतमोजणी केंद्राची पाहणी

ठाणे : विधानपरिषदेच्या कोकण व मुंबई पदवीधर तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या मतमोजणी चे दुसरे प्रशिक्षण आज नेरुळ येथील आगरी कोळी भवन येथे राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. यावेळी तीनही मतदार संघाच्या मतमोजणी संदर्भात प्रशासनाने केलेल्या तयारीची पाहणी श्री. चोक्कलिंगम यांनी केली.

यावेळी विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी पी. वेलरासू, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके,




रत्नागिरी चे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, सिंधुदुर्ग चे जिल्हाधिकारी किशोर तावडे, रायगड चे किशन जावळे, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी संजय यादव, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपायुक्त अमोल यादव उपस्थित होते.

यावेळी नगर परिषद संचालनालयाचे संचालक मनोज रानडे, उपायुक्त विवेक गायकवाड यांनी मतमोजणी साठी नियुक्त अधिकारी,कर्मचारी यांना प्रत्यक्ष मतमोजणीची माहिती दिली.

प्रशासनाने मतमोजणी साठी केलेल्या तयारीची पाहणी करून तसेच प्रशिक्षणाची तयारी पाहून श्री. चोक्कलिंगम म्हणाले की, विधानपरिषदेसाठीचे ही मतमोजणी वेगळी आहे. त्यामुळे परिपूर्ण कारण असल्याशिवाय मतपत्रिका अवैध ठरवू नका. तसेच मतपत्रिका वैध- अवैध ठरविताना काळजी घ्यावी. मतमोजणी प्रक्रियेसंबंधी अधिक माहितीसाठी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक नियमावलीचे अवलोकन करावे.

मत मोजणीच्या ठिकाणी प्रवेशासाठी अधीकृत पत्रकारांना प्रधिकार पत्रांचे वाटप करण्यात आले आहे. मतमोजणीच्या ठिकाणी प्रधिकार पत्र अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. मतमोजणीच्या ठिकाणी मोबाईल, कॅमेरा, लॅपटॉप सारख्या वस्तू नेणे प्रतिबंधित करण्यात आले आहे. याची सर्व पत्रकार बंधू-भगिनींनी नोंद घ्यावी. कृपया मतमोजणी कक्षात अशा वस्तू सोबत आणू नये आणि पोलीस यंत्रणेला सहकार्य करावे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१